# नायब तहसीलदारांनी दिलेले सर्व विलंबित जन्म दाखले रद्द

## पाच हजार जन्म प्रमाणपत्रांची होणार पुर्नतपासणी । अमरावती जिल्हाधिकारी यांचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )–** अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्ह्यातील 4 तहसीलमधील नायब तहसीलदारांनी दिलेले सर्व विलंबित जन्म दाखले रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. ही सर्व अर्ज व कागदपत्रे यांची फेरतपासणी करून अशा प्रकरणांमध्ये लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

राज्याच्या महसूल व वन मंत्रालयाने विभागीय आयुक्त, जिल्हादंडाधिकारी यांना पुढील आदेशापर्यंत विलंबित जन्म दाखले व मृत्यू दाखले देण्याची प्रक्रिया पुढे ढकलण्याचे निर्देश दिले होते. विलंबाने जन्म-मृत्यू दाखले देण्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता घडल्याच्या तक्रारी सरकारकडे येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर तहसीलदार या पदापेक्षा कनिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेली प्रमाणपत्रे रद्द करण्यात



यावीत आणि अशा प्रमाणपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पुनर्तपासणी करून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी सूचना राज्य सरकारकडून प्राप्त झाली. त्यानंतर अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्ह्यातील 4 तहसील मधील नायब तहसीलदारांनी दिलेले सर्व विलंबित जन्म दाखले रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. अमरावती, नांदगाव खंडेश्वर,अचलपूर आणि चिखलदरा तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांनी दिलेले विलंबित जन्म दाखले नाकारण्याचा निर्णय अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी घेतला आहे. या वादग्रस्त कालावधीत अमरावती तहसील कार्यालयातून 2823, नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयातून 271 अचलपूर तहसील कार्यालयातून 2,527 आणि चिखलदरा तहसील कार्यालयातून 1 विलंबित जन्म दाखला देण्यात आलेला आहे. त्यापैकी बहुतांश दाखले नायब तहसीलदार स्तरावरील अधिकारीच देतात. ती फेटाळल्याने आता सर्व प्रमाणपत्रे आणि त्यासाठी सादर केलेले अर्ज व कागदपत्रे यांची फेरतपासणी करून अशा प्रकरणांमध्ये लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे. भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात बांगलादेशी आणि रोहिंग्या बेकायदेशीरपणे स्थायिक झाल्याचा आरोप केला होता. ज्यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे विलंबित जन्म दाखलेही मिळवले आहेत. त्यामुळे अशा सर्व प्रकरणांची काटेकोरपणे चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली होती. अकोला जिल्ह्यातील नायब तहसीलदारांनी दिलेले विलंबित जन्म दाखले रद्द केल्याची माहिती देताना अमरावतीचे जिल्हादंडाधिकारी याबाबत सहकार्याची वृत्ती बाळगत नसल्याचा आरोपही केला होता.

### फेरचौकशी करून योग्य कारवाई करण्याच्या सूचना

आता राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने या संदर्भात आदेश जारी केल्याने अमरावती जिल्हाधिकारी यांनी जन्म प्रमाण रद्द करण्याची कार्यवाही केली. जिल्ह्यातील चार तालुक्यातून देण्यात आलेले दाखले नाकारण्याचे आदेश देण्यात आले असून अशा प्रकरणांची फेरचौकशी करून योग्य कारवाई करण्याच्या सूचना तहसीलदार व उपविभागीय दंडाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.



# तरुणांनो! मोर्चे, आंदोलन, दंगली यात पडू नका!

### ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदुरीकर

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.20 ) –** तरुणांनो मोर्चा, आंदोलन, दंगली यात पडू नका, त्यापेक्षा गावं आणि धर्मावर संकट आली असता एकत्र येऊन लढा. असे प्रतिपादन ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी छत्रपती बहुउद्देशीय संस्थेव्दारा शिवजयंतीचे निमित्ताने आयोजित जाहीर किर्तनामध्ये केले.

ते पुढे म्हणाले की, जेव्हा शाळा ही मंदिरे होतील तेव्हाच खऱ्या अर्थाने शिवजयंती साजरी होईल. शाळेमधुन सुसंस्कारित पिढी निर्माण झाल्याशिवाय समाजातील वृद्ध आई वडीलांची अवहेलना थांबणार नाही. आज कोण्या शेतकऱ्यांचे नव्हे, तर उच्चशिक्षित नौकरदारांचे आईवडील वृद्धाश्रमामध्ये असतात. विद्वान लोकं धर्माविरुद्ध कधिही बोलत नाही तर अल्पबुद्धीचे लोकंच धर्माविरुद्ध बोलतात. ज्ञान आलं कि ध्यान येतं, ध्यान आलं कि वाचा मौन होते. तसेच दुखानी निवृत्ती होते. अभ्यास, ज्ञान व ध्यान ही जिवनाची त्रिसूत्री आहे. संपत्ती आणि ज्ञान एका ठिकाणी राहत नाही. ह्या दैवी संपत्ती ज्या ठिकाणी एकत्र येतातस तो दैवी अवतार समजावा. हे गुण छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगीं असल्यामुळे ते दैवी अवतार होते. अश्या आशयाचे प्रबोधन ब्राम्हणवाडा थडी पोलिस ठाण्याचे समोरील प्रांगणात हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायासमोर केले.त्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब सोनार, पोलिस पाटील तर प्रमुख पाहूणे म्हणून उल्हास राठोड ठाणेदार, तसेच वासुदेव परांजपे, सुरेश बदुकले, राम सोनार, ह.भ.प.रमेश महाराज काळे, ह.भ.प.अरविंद महाराज कारीया, सुनील पाठक, अंभोरे महाराज् यांच्यासह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरवातीला शिवगर्जना व शिवपुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी पवार यांनी केले. तर प्रास्ताविक आकाश दाभाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश दाभाडे, सतिश आंबुलकर, शुभम सापधारे व संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी प्रयत्न केले.

# पाटबंधारे विभागाचा जनजागृती सप्ताह

### जलपुजन करुन जलप्रतिज्ञेचे केले वाचन

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.20 ) –** उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग अमरावती अंतर्गत उपविभाग धामणगाव येथे जनजागृती सप्ताहाला उत्साहात सुरुवात झाली. सहाय्यक अभियंता श्रेणी 1 यांच्याकडून जलपुजन करण्यात आले. वैभव वंजारी यांनी जलप्रतिज्ञा वाचन केले.



जगातील एकुण पाणी साठ्याच्या फक्त 3 टक्के पाणी पिण्यायोग्य आहे. त्यामुळे पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होऊ नये. पुढच्या पिढीला शुध्द पाणी मिळावे. या करीता आपण काळजी घ्यायला पाहिजे. दिवसेंदिवस पाणी पातळी खाली जात आहे. त्यामुळे पावसाचे पाणी नदी नाल्यांनी वाहून न जाता पाणी जमिनीत जिरविण्याचे प्रयत्न करावेत. पाण्याचा वापर लाभधारकांनी कमीत कमी करावा.या करीता पाणी वापर संस्थांमध्ये व्यापक जनजागृती करावी असे मत प्रमोद कडू यांनी व्यक्त केले. लाभक्षेत्रात जावून पाणी वापर संस्था सक्षमीकरण करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. शाखा अभियंता विशाल थुल, गौरी शेरकर, शेख, वरिष्ठ लिपिक संजय बरवटकर, लक्ष्मीदास डेकाटे, निखिल कांबळी, राहुल भोकरे, विशाल यादव, वैशाली नारे, दिलीप जाधव, अनंता खंडारे व इतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# तिवसा येथे शिवसेनेच्या वतीने शिवजयंती

### विविध उपक्रमाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा,( दि.20 ) –** येथील ग्रामिण रुग्णालयात 17 मार्च रोजी सकाळी 11 वाजता शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. यानिमीत्त्याने तिवस्यातील ग्रामीण रुग्णालयात फळ व भिस्कीट वाटप करण्यात आले, कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख दिलीप



केणे व शहर प्रमुख देविदास निकाळजे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक व तिवसा विधानसभा संघटक विलासराव माहुरे यांच्या उपस्थितीत यांच्या रुग्णांना फळ व बिस्कीट वाटप करून रुग्णाच्या समस्या जाणून घेतल्या गेल्या. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून हारार्पण करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून शिवसैनिकांनी जयघोष केला. यावेळी आकाश माहुरे, महादेव भुसाटे, शरद वानखडे, आशिष माहुरे, अनिल गावंडे, शरद इंगळे, अनिल कायंदे, सुभाष केवतकर, दीपक माहुरे, समीर निघोट, देवेंद्र निशानदार, अमोल माहुरे, गजु अंबोरे, रुपेश पिकलमुडे, अमित मनवरे यांच्यासह शेकडो शिवसैनिक व शिवप्रेमी उपस्थित होते.

# चोरीची ऑटोरिक्षा विकणारा जेरबंद

### खोलापुरी गेट पोलिसांची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.20 ) –** ऑटोरिक्षा चोरी केल्यानंतर त्याचे बनावट कागदपत्रे तयार करून तो ऑटो रिक्षा विकणाऱ्या एका सराईत गुन्हेगारास खोलापुरी गेट पोलिसांनी 18 मार्च रोजी अटक केली आहे. सागर मिश्रा (रा. म्हाडा कॉलनी, अमरावती) असे आरोपीचे नाव असून, तो सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पुढे आली आहे.

सागर मिश्रा हा म्हाडा कॉलनी येथे राहत असून त्याच्याविरुध्द जवळपास 17 ते 18 गुन्हे दाखल आहेत. यामध्ये चोरी, जबरी चोरी, वाहन चोरीसारखे गुन्हे खोलापुरी गेट, राजापेठ पोलीस स्टेशन तसेच ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये दाखल आहेत. त्याच्या या गुन्हेगारी प्रवृत्तीसाठी त्याला 2019 मध्ये पोलीस स्टेशन हद्दीतून दोन वर्षांसाठी तडीपार सुध्दा करण्यात आले होते. मुख्यत: गाड्या चोरून त्याचे पार्ट वेगवेगळे करणे आणि ते विकण्यात त्याचा विशेष हातखंडा आहे. खोलापुरी गेट पोलिसांनी आरोपीला अटक करून, 18 मार्च रोजी न्यायालयासमोर हजर केले असता, त्याला न्यायालयाने 21 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# राज्यस्तरीय युथ पार्लमेंटकरिता दहा विद्यार्थ्यांची होणार निवड

### विद्यापीठात विकसित भारत युथ पार्लमेंट 2025 चे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 ) –** केंद्र सरकारच्या युवा कार्य व खेळ मंत्रालयव्दारा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित अमरावती, अकोला, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी 'विकसित भारत युथ पार्लमेंट – 2025' चे आयोजन दिनांक 20 व 21 मार्च रोजी विद्यापीठ परिसरातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्या सभागृहामध्ये सकाळी 10.30 वाजता करण्यात आले आहे. विकसित भारत युवा संसद स्पर्धेत 150 विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

अमरावती, अकोला, यवतमाळ व वाशिम या चार जिल्ह्यांतील 18 ते 25 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांकडून दि. 16 मार्च पर्यंत माय भारत पोर्टलवर स्वतःच्या वकृत्व शैलीत विकसित भारत म्हणजे तुमच्यासाठी काय? या विषयाचा एक मिनिटाचा व्हिडीओ मागविण्यात आला होता. त्यामधून दि. 17 मार्च, 2025 रोजी स्क्रिनिंग कमिटीद्वारे 150 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सदर निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना दि. 20 व 21 मार्च रोजी 'वन नेशन, वन इलेक्शन = पेधव्हग दी वे फॉर विकसित भारत' या विषयावर आपले मत 3 मिनिटांमध्ये मांडावे लागणार आहे. सदर 150 विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट 10 विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय युथ पार्लमेंट-2025 करिता निवड करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाला कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे, अमित देशमुख, नितिन टाले, माजी पोलीस अधीक्षक पी. टी. पाटील, राज्यशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य डॉ. देवलाल आठवले, राष्ट्रीय सेवा योजना संचालक, डॉ. निलेश कडू, जिल्हा युवा अधिकारी नेहरु युवा केंद्र स्नेहल बासुतकर यांची उपस्थिती राहणार आहे.

# सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्र वैभवशाली राज्य- दिपक कुलकर्णी

### विद्यापीठात लोकनाट्य महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 ) –** विद्यार्थ्यांनी भारतातील वैविध्यपूर्ण कलापरंपरेचा अभ्यास करावा, त्यातून शिकावं, आस्वाद घ्यावा. महाराष्ट्र सांस्कृतिकदृष्टा वैभवशाली राज्य आहे, असे मार्मिक विचार भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूरचे सहायक संचालक दिपक कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाचे दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्रादर्शिक कला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 18 ते 20 मार्च दरम्यान आयोजित 'लोकनाट्य महोत्सव – 2025' चे उद्घाटन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी एम.टी. देशमुख, पुणे येथील ज्येष्ठ रंगकर्मी व नाट्य दिग्दर्शक संजय कुळकर्णी, प्रादर्शिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी उपस्थित होते. उद्घाटनानंतर लगेचच कोंकणातील सिंधूदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथील लोकनाट्य दशावतार हे बाळकृष्ण गोरे व त्यांच्या चमूंनी सादर केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी अमरावतीचे ज्येष्ठ रंगकर्मी एम.टी. देशमुख म्हणाले, दशावतार लोकनाट्याच्या कलाकारांनी आजही आपली लोककलेची परंपरा जोपासली आहे. दशावतार साकारणारे बाळकृष्ण गोरे यांनी बाल गंधर्व यांच्यासारखी प्रतिमा उभी केली, असे उद्गार एम.टी. देशमुख यांनी काढले. संजय कुळकर्णी म्हणाले, माणसं माणसांसाठी काहीतरी देत असतात, त्यामुळे कला जपल्या जातात. आपल्या लोककला, लोकसंस्कृती आजही जिवंत आहे. विद्यार्थ्यांनी लोककला आत्मसात कराव्या, या महोत्सवात सादर होणार्या लोककलांच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी दिपक कुलकर्णी यांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, दशावतारचे कलाकार बाळकृष्ण गोरे, एम.टी. देशमुख, संजय कुळकर्णी तसेच डॉ. भोजराज चौधरी यांचा शाल व मानचिन्ह देऊन सत्कार केला. संत गाडगे बाबा, नटराज प्रतिमा पूजन, दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकातून प्रादर्शिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी यांनी लोकनाट्य महोत्सव आयोजनामागील भूमिका सांगितली. सूत्रसंचालन रेणुका बोधनकर, तर आभार अमोल पाणबुडे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला अमरावती शहरातील विविध क्षेत्रातील गणमान्य नागरिक, विद्यार्थी तसेच प्रादर्शिक कला विभागातील विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

### देशातील लोककला विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतील – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, महाराष्ट्राला लोककलेची परंपरा लाभली आहे. अशा प्रकारच्या महोत्सवाच्या माध्यमातून देशातील लोककला विद्यार्थ्यांपर्यंत निश्चितच पोहचतील. तीन दिवस सादर होणा-या लोककलेचा विद्यार्थ्यांनी आस्वाद घ्यावा. दशावतार या लोकनाट्यातील कलाकारांशी संवाद साधल्यानंतर त्यांनी आपली ऐतिहासिक परंपरा आजही जोपासून ठेवल्याचे जाणवले. वंशपरंपरेपासून चालत आलेली दशावतार या लोकनाट्याची परंपरा त्यांनी आजही समर्थपणे उभी केली याचा अभिमान वाटतो, असेही कुलगुरू म्हणाले.

# अडुळाबाजारात भाविकांची मांदियाळी



### संत लहानुजी महाराज प्रकट दिन उत्साहात





### मान्यवरासह गुरुमाऊलींच्या परमभक्तांचा सत्कार

यावेळी ह.भ.प. दास पुंडलिक सांगवीकर, ह.भ.प. काकडे महाराज, ह.भ.प. डांगे महाराज, मृदंगाचार्य चेतन महाराज आळंदीकर यांच्याकडून तुकाराम गाथा पारायण पार पडले. यावेळी ज्ञानेश्वर महाराज भांडे, खा. बळवंत वानखडे, आ. प्रकाश भारसाकळे, आ. गजानन लवटे, बाळासाहेब पावडे, सुधाकर भारसाकळे, बाळासाहेब हिंगणीकर, रामेश्वर मालपाणी, नंदू सोमानी यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांचा तसेच गुरुमाउलींचे परमभक्त दानदाते सेवेकरी मंडळींचा सत्कार करण्यात आला. समाधीचे दर्शन घेतले. अडुळा बाजार गावाला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.20 ) –** श्रीसमर्थ लहानुजी महाराज यांचा 45 वा प्रगट दिन महोत्सव दर्यापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र अडुळाबाजार येथे 9 ते 16 मार्चदरम्यान आयोजित करण्यात आला होता. रविवारी श्रीसंत लहानुजी महाराजांचा प्रगट दिन महोत्सव उत्सवात साजरा करण्यात आला.

अडुळाबाजार येथील महोत्सवात दासगिरी महाराज (कृष्णाई गौरक्षण, आंबोडा) यांचे श्रीसंत चरित्र कथा व काल्याचे कीर्तन झाले. संत लहानुजी महाराज यांचा जयजयकार व हरिनामाचा गजर यावेळी करण्यात आला. 16 मार्च रोजी सकाळी 7 ते 10 च्या सुमारास %श्रीं%च्या पादुकांची शोभायात्रा काढण्यात आली. त्यानंतर दुपारी काल्याचे कीर्तन पार पडले. या ठिकाणी संत मेळावा आयोजित करण्यात आला होता. विदर्भातून अनेक ठिकाणाहून भाविक संत लहानुजी महाराजांच्या मंदिरात दाखल झाले होते.

व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. दास पुंडलिक सांगवीकर, ह.भ.प. निवृत्ती महाराज मानकर, ह.भ.प. मोहन महाराज मेतकर, ह.भ.प. वैभव महाराज तराळ यांनी केले. संगीत संचात गायक गणेश टापरे, ऑर्गनवर शंकर गायकवाड, तबल्यावर सारंग दागतोडे, ऑक्टोपॅडवर निखिल धुराटे होते. भरत असोले, गजानन कोरडे, रवींद्र टेकाडे, संजय जालंधर, श्याम गिरी यांनी देखाव्यासाठी परिश्रम घेतले. श्रीसंत लहानुजी महाराज यांच्या भूमिकेचे योगेश वानखडे यांनी सादरीकरण केले. सोहळ्याला संत लहानुजी महाराजांच्या हजारो भाविकांनी एकच गर्दी केली होती. आयोजकांनी संत लहानुजी महाराज याच्या प्रगट दिनानिमित्त भाविक भक्तासाठी आवश्यक त्या सोई सुविधासाठी नियोजन केले होते.

# गोवंश हत्याबंदी कायद्याची जिल्ह्यात पायमल्ली

## तस्करीसाठी बनावट ईटॅगचा वापर ● प्रकरण उघडकीस येउनही कारवाई नाही




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, (दि. 20)** महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू असला तरी अमरावती जिल्ह्यात मात्र या कायद्याची सर्रास पायमल्ली सुरु असल्याचे दिसून येते. जिल्ह्याच्या विविध भागात प्रामुख्याने मध्यप्रदेश सिमेवर असलेल्या परिसरातून गोवंशाची मोठ्या प्रमाणात कत्तलीसाठी तस्करी सुरु आहे. गोवंशाची तस्करी करणा ?यांनी त्यासाठी नविन शक्कल शोधून काढली असून बनावट ईटॅगचा वापर करण्यात येत आहे. बनावट ईटॅगचे असेच एक प्रकरण चांदुर रेल्वे पोलिसांनी उघडकीस आणले होते. पण चौकशीनंतर कारवाई कुठपर्यंत पोहोचली, याबाबत पोलिसांकडून माहिती दडपून ठेवण्यात आल्याने काहीही समजायला मार्ग नाही. पोलिसांनी हे प्रकरण दाबले की काय, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

### येथून होते तस्करी

अमरावती ग्रामीण पोलीस विभागाअंतर्गत येणा ?या धारणी, चिखलदरा, परतवाडा, आसेगाव, शिरजगाव कसबा, ब्राम्हणवाडा थडी, चांदूर बाजार, शेदुरजना घाट, वरूड, बेनोडा, मोर्शी, शिरखेड, शिराळा, चांदूरबाजार या भागातून अमरावती, तिवसा कडे रात्री ८ नंतर वेगवेगळ्या मार्गांनी गोवंशाची अवैध वाहतूक केली जाते. सकाळी 5 पर्यंत हा प्रकार सुरु असतो. मात्र संबंधित पोलिस ठाण्यांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.

### पालकमंत्र्यांनी लक्ष द्यावे

महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू असताना अमरावती जिल्ह्यात कत्तलीसाठी मोठ्या प्रमाणावर गोवंशाची तस्करी ग्रामीण भागातून सुरू आहे. कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असताना, पोलिस प्रशासन मुग गिळून गप्प आहे. आता या प्रकरणात आता जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्ष घालून हा गैरप्रकार थांबवावा, अशी मागणी गोप्रेमींकडून समोर आली आहे.

### शिंदे सरकारने स्थापन केला होता आयोग

राज्यात एकनाथ शिंदे यांचे सरकार असताना गोवंश हत्या बंदी कायदा अंमलबजावणीसाठी आयोगाची स्थापना करण्यात आली होती. गोवा, हरियाणानंतर महाराष्ट्र हे आयोग असलेले तिसरे राज्य होते. या आयोगासाठी दहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. मात्र अजूनही कायद्याची अंमलबजावणी पाहिजे त्या प्रमाणात झाली नसल्याचे चित्र दिसत आहे.

गौवंश तस्करीसाठी अमरावती जिल्ह्यात जनावरांना खोटे टॅग लावण्याचा प्रकार चांदुर रेल्वे पोलिसांनी काही महिन्यांपूर्वी उघडकीस आणला होता. मात्र त्या प्रकरणाचा अंतिम तपास कुठपर्यंत आहे याची माहिती देण्यास पोलिस टाळाटाळ करित आहेत. या प्रकरणात अनेक मोठे मासे अडकले जाणार असल्याची चर्चा असून त्यामुळेच राजकीय दबावापोटी प्रकरण शांत करण्यात आल्याचीही चर्चा आहे. सध्या बनावट ईटॅगचा वापर करून जिल्ह्यात आणि जिल्हा बाहेर कत्तलीसाठी मोठ्या प्रमाणात गोवंशाची तस्करी सुरु आहे. बनावट ईटॅगसंदर्भात चांदूर रेल्वे पोलिसांनी केलेली ही राज्यातील पहिलीच कारवाई होती.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी धामणगाव कॉँग्रेसचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

## सामाजिक प्रश्नांकडेही लक्ष वेधले



**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, (दि.20)** – सोयाबीन व चना खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात यावी, यासह शेतकऱ्यांशी संबंधित विविध मागण्यांसाठी धामणगाव रेल्वे काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक निवेदन पाठविण्यात आले. विविध सामाजिक प्रश्नांकडेही या निवेदनातून मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले आहे.

निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात आहे. शासनाकडून कुठलीही ठोस मदत मिळालेली नाही. अशात शासकीय सोयाबीन खरेदी थांबविण्यात आली तसेच नाफेड मार्फत चना खरेदीसाठी नोंदणीही सुरू झालेली नाही. यावर्षी सोयाबीन, कपाशी आणि तुरीला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. निवडणुकीच्या आधी महायुतीच्या नेत्यांनी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, सत्तेत आल्यानंतर ते हवेत विरले आहे. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवून त्यांना दिलासा देण्याची गरज आहे. त्यासाठी सरकारने सकारात्मक पावले उचलावीत, असे निवेदनात म्हटले आहे.

यासोबतच संत, समाज सुधारक आणि महापुरुषांचा वारसा लाभलेला पुरोगामी महाराष्ट्र आज काही समाजकंटकांकडून पेटविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सामाजिक व धार्मिक तेढ निर्माण करणारी वक्तव्य काही मंत्री व आमदारांकडूनच केली जात असून त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक वातावरण प्रदूषित झाले आहे. राज्यात दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यासाठी कारणीभूत असलेल्या प्रवृत्तींविरोधात कठोर कारवाई करून त्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. सात दिवसात या संदर्भात निर्णय झाला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे. तहसीलदारांना निवेदन सादर करतेवेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे, बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, शहर कार्याध्यक्ष चंदू डहाणे, नितीन कनोजिया, नितीन दगडकर, शुभम भोंगे, अविनाश इंगळे, मुकेश राठी, राजेंद्र भोंगे, विलास डुकरे, मयूर दुबे, तेजस दुबे, अंकुश कांकरिया, नंदू ढोले, आशिष तुपट,हविजय झाडे, प्रकाश बेलसरे, उमेश शिसोदे, अविनाश मांडवगणे, विजय निमकर, प्रवीण सुलताने, संदीप भोंगे, अजय तुपसुंदरे, अतुल आरेकर, प्रशांत उडे, गोविंद मुंदडा, रमेश हांडे, विशाल यादव, ओमप्रकाश हरवानी, प्रदीप गजबे, सोमनाथ श्रीखंडे, बंडू बनासुरे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# भातकुलीचे माध्यमिक शिक्षक घेताहेत क्षमतावृद्धीचे धडे

## गर्ल्स हायस्कूलमध्ये तालुका प्रशिक्षण





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.20)** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने भातकुली तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणाचे आयोजन 18 ते 22 मार्च या कालावधीत अमरावती येथील कॅंप परिसरात असलेल्या जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळेत करण्यात आले आहे.

या तालुकास्तरीय प्रशिक्षणात आठ तज्ञ मार्गदर्शक तालुक्यातील 90 माध्यमिक प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत आहेत. यात जिल्हा परिषद व खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचा समावेश आहे. जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेणारे शिक्षक तालुकास्तरावर तज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य करीत आहेत. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्वाचे बदल शिक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन कार्य नीती, क्षमता आधारित प्रश्न निर्मिती कौशल्य, विचार प्रवर्तक प्रश्न, समग्र प्रगतीपत्रक आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे. गटशिक्षणाधिकारी दीपक कोकतरे यांच्या मार्गदर्शनात चंद्रकांत कडवे हे या प्रशिक्षणाची समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. या तालुकास्तरीय प्रशिक्षणात पंकज शिरोडे, श्वेता पांडे, निलेश चाफलेकर, सुनील ढोणे, संजय गेडाम, राजेंद्र ठाकरे, भावना खांडे, संदीप भटकर हे तज्ञ मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावत आहेत. तर गटसाधना केंद्राचे चंद्रकांत कडवे यांचे सहकार्य लाभत आहे.

तालुक्यात चार टप्प्यात हे पाच दिवस प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणात इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्वच शिक्षकांचा सहभाग राहणार आहे. तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील 336 शिक्षकांना तीन टप्प्यात तालुका स्तरावर हे प्रशिक्षण देण्यात आले आहे. सध्या शेवटचा चौथा टप्पा सुरू असून त्याद्वारे 90 माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी दीपक कोकतरे यांनी दिली.

# हरिष देशमुख यांच्या अंधश्रद्धेसंदर्भातील पुस्तकाचे प्रकाशन

## अनिंसने केले कार्यक्रमाचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 20)** – अ.भा. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे महासचिव हरिष देशमुख यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रात काम करताना त्यांना आलेले प्रत्यक्ष अनूभव शब्दबद्ध करुन त्यातून अंधश्रध्दा वास्तव आणि जीवन मूल्ये हे पुस्तक लिहीले आहे. या पुस्तकासोबतच त्याच्या इंग्रजी अनुवादाचा आणि आणखी एका हिंदी पुस्तकाचे प्रकाशन नूकतेच अनुवादक आणि विचारवंत प्रा. नदीम खान यांच्या हस्ते झाले.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी प्रसिद्ध साहित्यिक सुनील यावलीकर, डॉ. बी. डी. बेलसरे, ॲड. गणेश हलकारे, संजय देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

पुस्तक लिहतानाचे काही अनुभव हरीश देशमुख यांनी यावेळी कथन केले. मेळघाटातील आदिवासी परिसरात नुकत्याच घेतलेल्या घटना संदर्भाने न टोनही, न डायन सिर्फ नाही ही हिंदी सचित्र पुस्तिका आदिवासी हिंदी पट्ट्यामध्ये आशा वर्कर, पोलिस पाटील, अंगणवाडी सेविका यासारख्या शासकीय यंत्रणेतील लोकांना अंधश्रध्दा विषय आदिवासी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे ते म्हणाले. पुस्तकाचे इंग्रजी अनुवाद नदीम खान यांनी अंधश्रध्दा निर्मूलनावर परखड भाष्य केले. गणेश हलकारे व सुनील यावलीकर यांनी मार्गदर्शनपर विचार व्यक्त केले. डॉ बी. डी.बेलसरे यांनी वर्तमान परिस्थितीत जास्तीत जास्त जनतेपर्यंत अंधश्रध्दा निर्मूलन कार्य कसे पोहचविणे गरजेचे आहे, या संदर्भाने अध्यक्षीय विचार व्यक्त केले.

या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते अंधश्रध्दा निर्मूलन कार्यात उल्लेखनीय काम करणा ?या जिल्ह्यातील गजानन चौखंडे, गौरव भराटे, हरीश यावले, ज्ञानेश्वर डवरे, मनीष सिंघवी, दिनेश कळसकर, प्रणिता चव्हाण, प्रकाश कळसकर, प्रदीप पाटील या कार्यकर्त्यांना 40 वर्षे पूर्ती निमित्य पदके देऊन सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक शेखर पाटील यांनी केले. संचलन हरीश केदार यांनी तर आभार प्रदर्शन मिलिंद मेश्राम यांनी केले. कार्यक्रमाला राजेंद्र इसाने, अनंतराव देशमुख, रणजीत घोडेस्वार, राजीव खिराडे, पुरुषोत्तम दाहेदार, राजेंद्र भांबोरे, सुभाष पांडे, सुधीर लसणकर, गजानन सूर्यवंशी, आयुष इंगोले, श्रीकृष्ण धोटे, निलेश कंचनपुरे आदी उपस्थित होते.

# विजया झाडे खांदेश रत्न पुरस्काराने सन्मानित



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, (दि. 20)**– नजीकच्या पार्डी येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे यांना आरंभ मराठी चॅनलतर्फे खान्देश रत्न पुरस्कार 2025 ने सन्मानित करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते (केळकर) सुरेश भोळे यांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन त्यांना एका कार्यक्रमात गौरविण्यात आले. विजया झाडे ह्या विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबवीत असतात. तळागाळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे काम त्या सतत करत आहेत. गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपासारख्या कार्यक्रमात त्यांचे मोलाचे योगदान असते. रक्तदान व गरजुंना साहित्य वाटप असे सामाजिक कार्य त्या करत आहेत. वृक्षारोपन व पर्यावरण संरक्षणासाठी त्या झटत असतात. त्या करीत असलेल्या शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी आणि कार्याची दखल घेउन त्यांना हा पूरस्कार बहाल करण्यात आला. याबद्दल सर्वच तरातून त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# गोपाल नगर येथे शिवजयंती उत्साहात साजरी

## विविध स्पर्धांचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 20)** – गोपाल नगर स्थित शिवनेरी चौकात शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवसेना उबाठाचे शहर प्रमुख संजय शेटे यांच्या नेतृत्वात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शिवजयंतीनिमित्त वेशभूषा स्पर्धेला परिसरातील महिला, तरुण-तरुणी व लहान मुली-मुले यांच्याकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बाल शिवाजी आणि जिजाउ माँ साहेब यांच्या वेशभूषा करुन स्पर्धक सहभागी झाले होते. विजेत्यांना आयोजकांतर्फे आकर्षक पूरस्कार देण्यात आले. यावेळी संगीताच्या कार्यक्रमात शिवगीत, पोवाडे, महाराष्ट्र गीत कलावंतांनी सादर केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना उपनेते सुधीर सूर्यवंशी, प्रीती ताई, माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, महिला आघाडीच्या लक्ष्मी शर्मा, श्रीमती गुल्हाणे, चंद्रकांत पोपट, माधुरी धर्माळे, राधा देखेकर, गजानन गुजरे, अमोल लाड, मोहन हजारे, गणेश तायवाडे, सुनील मनोज, संदेश जयस्वाल, संजय गवाडे, सचिन गवारे, स्वप्नील सोनवणे, बाळू चौधरी, शाम गवळी, बंडू शेटे, ॠषिकेश शेटे, शिवदास शेटे, रवींद्र सोमवंशी, मनोज मानके, उपस्थित होते. संजय शेटे यांनी आभार मानले.

# बोके ऑर्थोपेडिक व मॅटरनिटी केअर सेंटरचे उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 20)** – शहरातील पोटे पाटील मार्गावर असलेल्या समता कॉलनीत बोके ऑर्थोपेडिक व मॅटरनिटी सेंटरचा शुभारंभ करण्यात आला आहे. या अत्याधुनिक केअर सेंटरचे उद्घाटन माजी मंत्री व भाजपचे शहराध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांच्या हस्ते नुकतेच झाले. या केअर सेंटरमध्ये ऑर्थोपेडिक व मॅटरनिटी संदर्भातील आधुनिक हायटेक प्रणालीवर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे?. त्याबद्दल प्रवीण पोटे पाटील यांनी डॉ. भूषण बोके व डॉ. नयना बोके यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अमोल लावरे, कपिल आंडे, शंतनु देशमुख, अभिजीत बोके, छाया दंडाळे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# लेहगाव येथे शेतकरी पुत्राचे एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन

## आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना सामूहिक श्रद्धांजली



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, (दि. 20)** – शिवजयंतीचे औचित्य साधून मोर्शी तालुक्यातील लेहगाव येथे राष्ट्रीय महामार्गाच्या चौकीवर तालुक्यातील शेतकरी पुत्रांनी एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी तालुक्यातील विविध गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोर्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संजय तट्टे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. यावेळी विविध कारणांनी संकटात सापडलेल्या ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग पत्करला त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन करण्यात आले. शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेधही नोंदविण्यात आला. अनेक शेतकऱ्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे राज्यातील बळीराजा आज संकटाचा सामना करीत आहे. आर्थिकदृष्ट्या हवालदिल झालेले शेतकरी मोठ्या संख्येने आत्महत्या करीत आहेत. यवतमाळ जिल्ह्यात दोन दिवसात पाच शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. शेतकरी आत्महत्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. ही राज्यकर्त्यांसाठी लाजिरवाणी बाब आहे. पण तरीही त्यांना काहीच वाटत नाही. मीडिया भरकटलेला आहे. शेतकरी जगला काय, मेला काय कोणालाही त्याचे सोयर सुतक नाही. शेतकरी विरोधी कायदे करून सरकार शेतकऱ्यांना आणखीन संकटात लोटत आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संघर्ष करण्याची गरज आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

19 मार्च हा दिवस शेतकरी संवेदना दिवस म्हणून पाळायचा आणि यादिवशी एक दिवस उपवास करायचा असे किसान पुत्रांनी ठरवले होते. हा उपक्रम राजकीय नाही तर नैतिक आहे. आत्महत्या केलेल्या शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करण्यासाठी ही कृती करण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप रोडे यांनी केले होते. या आंदोलनात राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघ, संयुक्त किसान मोर्चा, शेतकरी संघर्ष समिती, आपुलकी संस्था लोकविकास संघटना शेतकरी संघटना आणि शेतकरी चळवळीतील इतर संघटना सहभागी झाल्या होत्या. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिलांना साडी-चोळी भेट देण्यात आली. याप्रसंगी मुरलीधर डहाणे, सुधाकर गायकी, संदीप भुजाळे, बाळासाहेब कोराटे, निलेश तट्टे, संदीप रोडे, डॉ. चंद्रकांत देशमुख, देवानंद कोरे, संजय कोल्हे, बाळासाहेब पुंड, सरपंच मीना अतिश मोहोळ, साहेबराव खडसे, अरविंद तट्टे, बंडू टारपे, वसंत काळे, आशिष यावले प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन हरीश निशाण यांनी केले.


## जाहीर सुचना

माझे अशील आदिल खान नासिर खान, रिवाज खान नासिर खान, मसुदा खा कासम खान, जमिल खा कासम खान यांची खालील मिळकतीचे मुळ मृत्यूपूत्र दि. २९/११/१९९९ र.द.क्र. १५३५ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याद्वारे सर्वास कळविण्यात येते की, या मिळकती बाबत वरिल दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्रापत झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

सदर मिळकत ही म.न.पा. अमरावती व दु.नि. अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, नझूल शिट क्र. ६७ ए प्लॉट क्र. ७९/२ याचे क्षेत्रफळ ६३.७२ चौ.मि. यावर रहाते घर, मौजे पेठ अमरावती प्रगणे बडनेरा ता. व जि. अमरावती याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस : – लाल खान यांचे घर,
पश्चिमेस :– शेख करिम यांचे घर
उत्तरेस :– रोड
दक्षिणेस :– रोड

शिक्का

पत्ता :–ॲड. वैभव न. काकिर्डे अॅन्ड,
१९, हरिओम कॉलनी संताजी नगर,
अमरावती ९०७३८२१००१

